## प्रेस नोट दि.१०/०३/२०२५

### घरफोडी चोराकडुन २०.९३ तोळे सोन्याचे व २३.२२ तोळे चांदीचे दागिने जप्त शहर गुन्हे शाखेची कामगिरी.

---

**दि.०१/०३/२०२५** रोजी, स.पो.नि. संदिप पाटील व त्याचे पथक फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील सिध्देश्वर मंदिर परिसरात पेट्रोलिंग करीत असताना, गणपती घाट येथे एक इसम, पथकाची नजर चुकवुन जात असताना दिसुन आला. त्यामुळे पथकास त्याचा संशय आल्याने, स.पो.नि. संदिप पाटील व त्याचे पथकाने त्यास थांबवुन त्याचे नांव व पत्याबाबत विचारपूस केली असता तो दिशाभुल करणारी माहिती देवुन त्याचे नांव- पी.एस. पाटील, रा. कोल्हापूर असे असल्याचे सांगुन काही एक त्याचे नावा बाबत पुरावे देवु शकला नाही. तसेच तो मोबाईल देखील वापरत नव्हता. त्यामुळे त्याचेकडे चौकशी करणे आवश्यक असल्याने, त्यास गुन्हे शाखा कार्यालयात आणुन, त्याचेकडे स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे पथकाने, कौशल्यपुर्वक तपास केला असता, त्यांचे संपुर्ण **नांव-प्रदिपकुमार रामचंद्र कोळी, वय-४५ वर्षे, रा. कवठेमहाकाळ, जि.सांगली, सद्या- बाळे ब्रिज जवळ, सोलापूर** असे असल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्याने नोंव्हेबर-२०२३ मध्ये एमआयडीसी पोलीस ठाणे गुरनं-७९१/२०२३ भादंवि-४५४,४५७,३८० हा गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने, त्यास गुन्ह्यात अटक करून, गुन्ह्यातील गेलामाल हस्तगत करणेकामी त्याची पोलीस कोठडी रिमांड घेतली असता, त्यांने खालील प्रमाणे गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे दागिने काढुन दिले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं / कलम | जप्त मालाचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | एमआयडीसी | गुरनं-७९१/२०२३ भादंवि-४५४,४५७,३८० | **२०९.३६३ ग्रॅम सोने**<br>**२३२.२ ग्रॅम चांदी** |

वरील प्रमाणे, रात्रौ घरफोडी चोरीचा गुन्हा उघडकीस आला असुन, त्यामध्ये **२०९.३६३ ग्रॅम (२०.९३ तोळे) सोन्याचे व २३२.२ ग्रॅम (२३.२२ तोळे) चांदीचे दागिने** असा एकुण **रू.९,४८,३१६/-** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी, मा. श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, मा. डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, मा. राजन माने, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. संदिप पाटील, व पोलीस अंमलदार-विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, निलोफर तांबोळी, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड चालक-फरदीन शेख, यांनी केली आहे.

10/3

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करीता**

Scanned with OKEN Scanner